**महसूल विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील महसूल, नोंदणी व मुद्रांक तसेच भूमि अभिलेख या उपविभागातील अधिकारी/कर्मचारी यांच्या नियतकालीक बदल्या व पदोन्नतीनंतरच्या पदस्थापना संगणकीय प्रणाली आधारे (Online) करण्यासाठी सर्वसमावेशक धोरण निश्चित करण्यासाठी समिती गठीत करण्याबाबत...**

## महाराष्ट्र शासन
## महसूल व वन विभाग
**शासन निर्णय क्र. धोरण-२०२६/प्र.क्र.२६/ई-१६७८४१०/आस्था-१-अ**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ९ जून, २०२६.

**प्रस्तावना :-**

मा.मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षेतेखाली दि.२६.०५.२०२६ रोजी आढावा बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीमध्ये अपर मुख्य सचिव (महसूल) यांनी नियतकालीक बदल्या व पदोन्नती संदर्भात सुधारित धोरण निश्चित करण्याबाबत सादरीकरण करण्यात आले. त्यामध्ये महसूल विभागाच्या अधिपत्याखालील महसूल प्रभाग, भूमि अभिलेख प्रभाग व नोंदणी व मुद्रांक शुल्क प्रभाग यांच्या अधिनस्त कार्यालयांतील अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या नियतकालीक बदल्या व पदोन्नतीनंतरच्या पदस्थापना हया गुणवत्तेच्या आधारे करण्यासाठी संगणकीय प्रणाली (Online) तयार करण्याची बाब अधोरेखीत करण्यात आली. तद्दनुषंगाने धोरण निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :-**

महसूल विभागाच्या अधिपत्याखालील महसूल प्रभाग, भूमि अभिलेख प्रभाग व नोंदणी व मुद्रांक शुल्क प्रभाग यांच्या अधिनस्त कार्यालयांतील अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या नियतकालीक बदल्या व पदोन्नतीनंतरच्या पदस्थापना संगणकीय प्रणाली आधारे (Online) करण्यासाठी सर्वसमावेशक धोरण निश्चित करण्यासाठी विभागीय आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करुन दि. ३० जून, २०२६ पर्यंत समितीच्या शिफारशी शासनास सादर करण्याबाबत मा.मंत्री (महसूल) यांनी निर्देश दिले.

सबब, वरील निर्देशाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

**१. समितीची रचना :-**

| अ.क्र. | पद | पदनाम |
|---|---|---|
| १. | विभागीय आयुक्त, पुणे | अध्यक्ष |
| २. | जमाबंदी आयुक्त आणि संचालक,भूमि अभिलेख, पुणे | सदस्य |
| ३. | नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक महाराष्ट्र राज्य पुणे | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ४. | श्री.सत्यनारायण बजाज, सहसचिव, (मुद्रांक) महसूल व वन विभाग | सदस्य |
| ५. | श्रीम.आश्विनी यमगर, उपसचिव,(भूमि अभिलेख) महसूल व वन विभाग | सदस्य |
| ६. | श्री. महेश वरुडकर, उपसचिव, (महसूल) महसूल व वन विभाग | सदस्य |
| ७. | महसूल विभागातील गट अ, गट ब व गट क या संवर्गातील प्रत्येकी एक प्रतिनिधी | निमंत्रित सदस्य |
| ८. | जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, कार्यालयातील गट अ,गट ब व गट क या संवर्गातील प्रत्येकी एक प्रतिनिधी | निमंत्रित सदस्य |
| ९. | नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, कार्यालयातील गट अ, गट ब व गट क या संवर्गातील प्रत्येकी एक प्रतिनिधी प्रतिनिधी | निमंत्रित सदस्य |
| १०. | अपर आयुक्त, (महसूल) विभागीय आयुक्त, कार्यालय, पुणे | सदस्य सचिव |

२. **समितीची कार्यकक्षा :-**

१. उक्त कार्यालयांतील अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या नियतकालीक बदल्या व पदोन्नतीनंतरच्या पदस्थापना संगणकीय प्रणाली आधारे (Online) करण्यासाठीची कार्यपध्दती निश्चित करणे

२. अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या नियतकालीक बदल्या व पदोन्नतीनंतरच्या पदस्थापना करण्यासाठी गुणवत्तेचे निकष ठरविणे.

३. पदस्थापनेची शिफारस करतांना अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या सेवेचा करीअर मॅप (Carrier Map) निश्चित करणे.

४. तसेच अधिकारी / कर्मचारी यांचा कॅडर मॅप (Cader Map) निश्चित करणे.

५. सर्व विभागांमध्ये अधिकारी कर्मचारी यांच्या पदस्थापन करण्याच्या अनुषंगाने प्रादेशिक समतोल साधण्यासंदर्भात शिफारसी करणे.

६. विभागीय आयुक्त, पुणे यांनी त्यांच्या अध्यक्षतेखाली उपरोक्त सदस्यांसमवेत बैठका आयोजित करुन **दि. ३० जून, २०२६** पर्यंत समितीच्या शिफारशी शासनास सादर कराव्यात.

४. सदर प्रकरणी अपर आयुक्त, (महसूल) विभागीय आयुक्त, कार्यालय, पुणे यांनी विभागीय आयुक्त, यांच्या निर्देशानुसार बैठकांचे आयोजन करावे व अहवाल दि. ३० जून, २०२६ पर्यंत शासनास सादर करावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या या संकेतस्थळावर www.maharashtra.gov.in उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०२६०६०९१०३९२२३७१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(महेश वरुडकर)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव

२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव

३. मा. उपमुख्यमंत्री तथा मंत्री (नगर विकास/गृहनिर्माण) यांचे सचिव

४. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क,क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ) यांचे सचिव

५. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव

६. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव

७. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई

८. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग

९. विभागीय आयुक्त, (सर्व)

१०. जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी (सर्व)

११. अपर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) (सर्व)

१२. अपर जिल्हाधिकारी (सर्व)

१३.उप जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) (सर्व)

१४.उप जिल्हाधिकारी (सर्व)

१५. तहसिलदार (सर्व)

१६. नायब तहसिलदार (सर्व)

१७. निवडनस्ती (आस्था-१-अ)